दै. पुण्य नगरी

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

गुरुवार, दिनांक 10 MAR 2016

# विद्यापीठात संख्याशास्त्रावर उद्यापासून राष्ट्रीय परिषद

## देशभरातून १४ प्रख्यात संख्याशास्त्रज्ञांचा सहभाग

**कोल्हापूर / प्रतिनिधी :**

शिवाजी विद्यापीठामध्ये संख्याशास्त्र अधिविभागामार्फत दि. ११ व १२ मार्च रोजी 'उपयोजित संख्याशास्त्रावर (अप्लाईड स्टॅटिस्टिक्स) राष्ट्रीय परिषदेचे' आयोजन करण्यात आले आहे.

परिषदेचे उद्घाटन कुलगुरू प्रा. देवानंद शिंदे यांच्या अध्यक्षतेखाली व संख्याशास्त्र अधिविभागाचे माजी विभागप्रमुख प्रा. एम. एस. प्रसाद यांच्या प्रमुख उपस्थितीत शुक्रवारी (दि. ११) सकाळी १० वाजता मानव्यशास्त्र सभागृहामध्ये होत आहे. परिषदेचे बीजभाषण प्रा. डॉ. डी. व्ही. एस. शास्त्री, रिझर्व्ह बँक ऑफ इंडियाचे माजी प्रमुख सल्लागार करणार आहेत. प्रा. डी. टी. शिर्के परिषदेचे समन्वयक असून डॉ. डी. एन. काशीद, विभागप्रमुख यांच्या मार्गदर्शनाखाली परिषद होत आहे.

दि. १२ मार्च रोजी कार्यालयीन 'सांख्यिकीच्या सशक्तीकरणासाठी शैक्षणिक संस्थांची भूमिका काय असावी?' या विषयावर विशेष चर्चासत्र आयोजित करण्यात आले असून त्यामध्ये विविध शासकीय विभागांतील अधिकारी आपली मते मांडणार आहेत. यामध्ये जिल्हा नियोजन अधिकारी, कोल्हापूर व सांगली हे चर्चेमध्ये सहभाग घेणार आहेत.

परिषदेमध्ये देशभरातून १४ प्रख्यात निमंत्रित संख्याशास्त्रज्ञ सहभागी होत आहेत. सावित्रीबाई फुले पुणे, उत्तर महाराष्ट्र, जळगाव, सोलापूर, मुंबई, बेंगलोर विद्यापीठ, महाविद्यालये व शासकीय विभागांतून एकूण ७० संशोधक विद्यार्थी, प्राध्यापक व शासकीय अधिकारी सहभागी होणार असून त्यापैकी ३० संशोधक विद्यार्थी व शिक्षक आपले संशोधन सादर करणार आहेत.

दै. सकाळ गुरुवार, दिनांक 10 MAR 2016

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

# भ्रूणहत्या टाळण्याची जबाबदारी सर्वांची

## जिल्हाधिकारी डॉ. सैनी : शिवाजी विद्यापीठ, 'माविम'तर्फे बचत गटांतील महिलांचा मेळावा

**सकाळ वृत्तसेवा**

कोल्हापूर, ता. ९ : जिल्ह्यावरील स्त्री-भ्रूणहत्येचा कलंक पुसण्याची जबाबदारी प्रत्येकाची आहे, असे प्रतिपादन जिल्हाधिकारी डॉ. अमितकुमार सैनी यांनी आज येथे केले.

शिवाजी विद्यापीठ, महिला आर्थिक विकास महामंडळ (माविम), कृषी विज्ञान केंद्र (तळसंदे), नशाबंदी मंडळ, ज्योती स्किल्स अँड



डॉ. सैनी

सर्व्हिसेसतर्फे जागतिक महिला दिनानिमित्त आयोजित बचत गटांतील महिला मेळाव्यात ते बोलत होते. लोककला केंद्रात मेळावा झाला.

डॉ. सैनी म्हणाले, ''बचत गटांच्या माध्यमातून आर्थिक विकासाबरोबरच सामाजिक बांधिलकी जोपासणे आवश्यक आहे. महिला आर्थिक विकास महामंडळाचे नाव आता 'महिला आर्थिक, सामाजिक विकास मंडळ' होणे अधिक संयुक्तिक ठरेल. कोल्हापूर जिल्ह्याला स्त्री-भ्रूणहत्येचा कलंक लागला आहे. मुलींच्या जन्माचे प्रमाण कमी झालेले आहे. यासंदर्भात जागृती होणे आवश्यक आहे. महिला बचत गटांवर घरातील पुरुषांचे नियंत्रण असणे उचित नाही.'' महिलांनी केंद्र सरकारच्या पंतप्रधान जीवन ज्योती, जीवन सुरक्षा या योजनांमध्ये त्वरित सहभाग नोंदविणे आवश्यक आहे, असे आवाहनही त्यांनी केले.

कुलगुरू डॉ. देवानंद शिंदे म्हणाले, ''महिलांच्या सक्षमीकरणासाठी बचत गटांच्या माध्यमातून प्रभावी कार्य चालू आहे. स्त्रीशक्ती समाजाची प्रबळ प्रेरक शक्ती आहे. या शक्तीचा सर्वांगीण विकास करण्यासाठी त्यांच्यामधील अंगभूत कौशल्यांचा विकास होणे आवश्यक आहे आणि त्या कौशल्यांच्या आधारे समाजाची प्रगती करण्यासाठी योगदान देण्यास त्यांनी सज्ज होण्याची गरज आहे.''

जिल्हा पोलिस अधीक्षक प्रदीप देशपांडे म्हणाले, ''केवळ ८ मार्च हाच दिवस महिला सक्षमीकरणाचा नसून वर्षातील सर्वच दिवस महिला सक्षमीकरणाचे आहेत, असले पाहिजेत. महिलांनी स्वत:ला दुर्बल आणि कमजोर समजू नये. त्यांनी कौटुंबिक हिंसाचाराला बळी पडू नये.''

या वेळी बचत गटांच्या माध्यमातून उत्कृष्ट कार्य केलेल्या महिलांना मान्यवरांच्या हस्ते पारितोषिके देण्यात आली. 'माविम'चे जिल्हा समन्वय अधिकारी बाळासाहेब झिंजाडे यांनी प्रास्ताविक केले.

प्रभारी कुलसचिव डॉ. व्ही. एन. शिंदे, डॉ. डी. के. गायकवाड, डॉ. गोरखनाथ कांबळे, डॉ. वासंती रासम, अनिता शिंदे, डॉ. ए. एम. गुरव, अमोल मडामे, वर्षा विद्या विलास, अभिनेत्री पूजा पवार उपस्थित होते. डॉ. सुमन बुवा यांनी आभार मानले.

दै. तरुण भारत गुरुवार, दिनांक 10 MAR 2016

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

# महिलांसाठी विकास महामंडळाची गरज

## जिल्हाधिकारी डॉ. अमित सैनी यांचे प्रतिपादन : २६ हजार महिलांना मिळाला विकासाचा मार्ग, बचत गटातील महिलांचा सत्कार

प्रतिनिधी
कोल्हापूर

आर्थिक विकास महामंडळाने जिल्ह्यात २६ हजार महिलांना विकासाचा मार्ग दाखविला आहे. या कामाला गती देत सामाजिक बांधीलकी जपण्यासाठी महिला आर्थिक व सामाजिक विकास महामंडळाची स्थापना होण्याची गरज आहे, असे प्रतिपादन जिल्हाधिकारी डॉ. अमित सैनी यांनी केले.

शिवाजी विद्यापीठातील लोककला केंद्रामध्ये महिला आर्थिक विकास महामंडळ, तळसंदे येथील कृषी विज्ञान केंद्र, नाबार्ड मंडळ महाराष्ट्र राज्य, ज्योती फिल्म अन्‍ड सर्व्हिसेस, प्रौढ आणि निरंतर शिक्षण केंद्र, शारदाबाई पवार अध्यासन केंद्र यांच्या संयुक्त विद्यमाने जागतिक महिला दिनानिमित्त आयोजित महिला बचत गटांच्या सत्कार समारंभात ते बोलत होते. पोलीस अधिक्षक प्रदीप देशपांडे, पोलीस उपअधिक्षक भारतकुमार राणे, शिवाजी विद्यापीठाचे प्रभारी कुलसचिव डॉ. व्ही. एन. शिंदे, नागरबाई शिंदे, अनिता शिंदे, शारदाबाई अध्यासन केंद्राच्या समन्वयक डॉ. वासंती रासम, प्रौढ आणि निरंतर शिक्षण केंद्रप्रमुख डॉ. गोरख कांबळे, अभिनेत्री पुजा पवार आदी प्रमुख उपस्थित होते. आदर्श माता पुरस्काराने नागरबाई शिंदे यांना गौरविण्यात आले. तसेच विविध उत्कृष्ट बचत गटांचा सत्कार करण्यात आला.



कोल्हापूर : शिवाजी विद्यापीठातील लोककला केंद्रामध्ये महिला आर्थिक विकास महामंडळातर्फे महिला दिनानिमित्त महिला मेळाव्याच्या उद्घाटनप्रसंगी सावित्रीबाई फुले यांच्या फोटोचे पूजन करून दिपप्रज्वलन करताना अनिता शिंदे, सोबत अभिनेत्री पुजा पवार, जिल्हाधिकारी डॉ. अमित सैनी, डॉ. व्ही. एन. शिंदे, बाळासाहेब हुंजाई, नागरबाई शिंदे, डॉ. वासंती रासम.

जिल्हाधिकारी डॉ. सैनी म्हणाले, बचत गटांच्या माध्यमातून महिला संघटन झाले पाहिजे. बचत गटांनी आर्थिक उन्नतीच्या दृष्टीने पाऊल उचलले पाहिजे. बचत गटाच्या माध्यमातून महिलांचे आर्थिक सक्षमीकरण होत आहे, ही गोष्टी कौतुकास्पद आहे. पण सामाजिक जबाबदारी म्हणून स्त्रीभ्रूण हत्या रोखण्यासाठी महिला बचत गटांनी संघटित होण्याची गरज आहे. राजकारणातही बचत गटांचा दबदबा निर्माण होत आहे. त्यामुळे बचत गटाच्या माध्यमातून महिला राजकारणात येत आहेत. बचत गटातील महिलांनी प्रधानमंत्री जीवन ज्योती योजना, पंतप्रधान जीवन सुरक्षा योजना, पंतप्रधान पेन्शन योजना या सरकारी योजनांचा लाभ सर्व महिलांनी लाभ घ्यावा असे आवाहन केले.

पोलीस अधिक्षक प्रदीप देशपांडे म्हणाले, महिला दिनाचे औचित्य साधून महिलांवरील अत्याचार रोखण्यासाठी पोलीस दलाने 'प्रतिसाद' ॲप्लिकेशनचे उद्घाटन केले आहे. हे ॲप्लिकेशन गुगलवर उपलब्ध आहे. महिलांनी आपल्या स्मार्टफोनवर हे ॲप्लिकेशन डाउनलोड करून घ्यावे. संकटसमयी या ॲप्लिकेशनमधील सोशल इमरजन्सी बटन दाबल्यास तुमचे नाव, मोबाईल नंबर, तुम्ही असलेले ठिकाण संबंधीत पोलीस स्टेशनला मेसेज जाईल. त्वरित घटनास्थळी पोलीस पोहचतील आणि तुमच्यावरील संकट दूर होईल. तसेच गरीब महिलांना मोफत कायदेशीर सल्ला देण्याची सोय आहे.

---

दै. सकाळ
जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर
गुरुवार, दिनांक 10 MAR 2016

## 'उपयोजित संख्याशास्त्र'वर विद्यापीठात उद्यापासून परिषद

---

दै. तरुण भारत
गुरुवार, दिनांक 10 MAR 2016

## विद्यापीठात उद्या संख्याशास्त्र विषयावर राष्ट्रीय परिषद